# प्रा. शेख परवीन यांना पीएच डी पदवी



शेख परवीन

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील हिंदी विभागातील पदव्युत्तर शिक्षक प्रा. शेख परवीन बेगम शेख इब्राहिम यांनी 'नासिरा शर्मा के कथा साहित्य में अल्पसंख्यक विमर्श' या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयात पीएच डी ही पदवी प्रदान केली आहे. त्यांना प्रा. संतोष येरावार यांचे मार्गदर्शन लाभले. शैक्षणिक क्षेत्रातील पदवी मिळाल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी हिंदी विभागप्रमुख डॉ. संतोष येरावार व डॉ. व्यंकट खंदकुरे यांनी आभिनंदन केले आहे.